बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक २०२ सोमवार दि. २२ सप्टेंबर २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■ पाने-४



सायं.दैनिक बीड प्रारंभ
संपादक - जालिंदर ज्ञानदेव धांडे

# जिल्ह्यात धुवाँधार; ओला दुष्काळ

## संदीपभैय्यांनी यंत्रणा हलवत पाच जणांना सुखरूप काढले बाहेर



नागरिकांचे जीव वाचविण्यासाठी आ.क्षीरसागर उतरले पुराच्या पाण्यात



- माय-बाप सरकार जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा
- शिरापूर गात येथील राहिंजवस्तीत पुराचे पाणी,
- सिंदफणा नदीला महापूर, शिरूरच्या बाजारपेठेत पाणी,
- जिल्ह्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : जिल्ह्यात गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून पडत असलेल्या धुवॉधार पावसाने जिल्ह्यातील सर्वच तलाव तुडूंब भरले आहेत. यामुळे पावसाचे पाणी आता थेट नद्यात येत असल्यामुळे छोट्या-मोठ्या नद्यांना महापूर येवू लागला आहे. रविवारी रात्री जिल्ह्यात सर्वत्र धुवॉधार पाऊस पडल्याने जिल्ह्यातीलअनेक गावांचा संपर्क तुटला.
ठिकठिकाणच्या नद्यांना महापूर आल्याने पुराचे पाणी थेट गावात शिरल्याचे चित्र जिल्ह्यात पहायला मिळाले. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा नदी परत एकदा दुथडी भरून वाहू लागली आहे. विशेषत: या नदीचे पात्र एवढे वाहात होते की, सिंदफणेचे रौद्ररूप सर्वांना पहायला मिळाले. शिरूर कासार येथीलबाजारपेठेतही पाणी शिरल्याने अनेक व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच शिरूर तालुक्यातीलशिरापूर गात याठिकाणी पुराचे पाणी अचानक शिरल्याने या पुरात पाचजण अडकले होते. याची माहिती मिळताच बीड मतदारसंघाचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यंत्रणा हलवत स्वत: या मोहिमेत सहभाग घेतला. अखेर या पाचही जणांना पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यात आले. तसेच आष्टी मतदारसंघातील कडा नदीला परत महापूर आल्याने या परिसरात सुद्धा सर्वत्र पाणीच पाणी झाले होत.

### जिल्ह्यात २९ मंडळात अतिवृष्टी, तलवडा मंडळात ११५.३ तर लिंबागणेश १०७.३ मि.मी.पाऊस

**बीड तालुक्यातील मंडळात झालेली अतिवृष्टी**

राजुरी-८२.८ मि.मी. पेंडगाव-७०.५ मांजरसुंबा-९० चासाळा-९५.५ नेकनूर-६६.३ लिंबागणेश-१०७.३ येळंबघाट-६६.३ चऱ्हाटा-८२.८ शिरसपारगाव-८२.८

**बिंदुसरेचे खोलीकरण केल्यामुळे बीडकरांना दिलासा**

बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीपात्राचे खोलीकरण व स्वच्छता मोहीम राबविल्यामुळे यावेळेस बिंदुसरेला मोठा पूर येवून सुद्धा आतापर्यंत पुराचे पाणी शहरात शिरले नाही. आ.संदीप क्षीरसागर यांनी दूरदृष्टी ठेवून या नदीपात्राचे खोलीकरण केले होते. त्यांच्या या उपक्रमामुळे आज पुराच्या पाण्यापासून बीडकरांना दिलासा मिळत आहे. बीड मतदारसंघामध्ये कायम संपर्कात असलेले आ.संदीप क्षीरसागर पुराच्या पाण्यातून नागरिकांना वाचविण्यासाठी आज स्वत: पुराच्या पाण्यात उतरले. यासह त्यांची टिमही सर्वत्र सतर्क असून कोणाला काही अडचण आल्यास तात्काळ आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आ.क्षीरसागरांच्या वतीने करण्यात आले आहे.

**पाटोदा-आष्टी-शिरूर, गेवराई, धारूर तालुक्यातील मंडळात झालेली अतिवृष्टी**

पाटोदा :-७४.३, अंमळनेर-६७.००, आष्टी : दौलावडगाव-८०, धामणगाव-६७.५, डोईठण-६७, धानोरा-६५.८, दादेगाव-६५.८, शिरूर : ६७.३, रायमोहा-६८.८, तिंतरवणी-६७, ब्रम्हनाथ येळंब-६७.३, गोमळवाडा-६७, खालापुरी-६८.८, गेवराई-७९.३, धोंडराई-८७.३, उमापूर-६७, चकलांबा-६७, रेवती-७७.८, तलवडा-११५ धारूर : ८६.८

## गेवराई बाजार समितीच्या सभापतीपदी जगन्नाथ काळे व उपसभापतीपदी श्रीमती लक्ष्मीबाई पवार यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी जगन्नाथ काळे आणि उपसभापती सौ. लक्ष्मीबाई पवार यांची निवड करण्यात आली असून माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी सामाजिक समतोल साधत धनगर समाजालाला न्याय दिला आहे. यावेळी धनगर समाजाच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी सभापती मुजिब पठाण, कुमारराव ढाकणे, माजी उपसभापती विकास





माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी साधला सामाजिक समतोल

सानप, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, संभाजीराव पवळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मराठवाड्यातील आग्रगण्य बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजिब पठाण आणि उपसभापती विकास सानप यांनी कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर आपल्या पदाचे राजीनामे दिल्यामुळे रिक्त झालेल्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी सर्व संचालक व निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक निबंधक दिपक पवळ हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे आणि उपसभापती श्रीहरी पवार यांचा सत्कार करण्यात आला.

सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला -अमरसिंह पंडित

ग्रामीण ▶▶ पान २ वर...

## माँ वैष्णोदेवी मंदिरात महादेव महाराज व एसपी नवनीत कॉवत यांच्या हस्ते झाली घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

बीड शहरासह जिल्हाभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बीड शहरातील विप्रनगर ब्राह्मणवाडी भागातील वैष्णोदेवी मंदिर संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्र महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. आजपासून नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे . बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते माँ वैष्णोदेवी मंदिरात मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीभावाच्या वातावरणात घटस्थापना करण्यात आली.



**भाविकांनी नवरात्र उत्सवात दर्शनाचा लाभ घ्यावा -संतोष सोहनी**

यावेळी माँ वैष्णोदेवी मंदिर संस्थांनचे संस्थापक अध्यक्ष संतोष सोहनी, विनोद पिंगळे, अशोक वाणी साहेब (दै. झुंजार नेता उपसंपादक), अंगद नवले, संजय सोहनी ( माँ.वैष्णोदेवी मंदिर संस्थान कोषाध्यक्ष) नानासाहेब रावसाहेब काकडे पोलीस पाटील चाकरवाडी, दिनकरराव कदम, राणा चव्हाण, राजेंद्र बनसोडे, पवन शर्मा, मोहित कासट, स्वप्निल देशमुख, बाळा इंगळे, जय सोहनी, शिवप्रसाद दायमा, गोविंद तोष्णीवाल, राम बिलास सोहनी, नारायणदास तोष्णीवाल, गर्जे मामा, लड्डा, यश शर्मा, सुरेश बनसोडे, महेश काका, यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड शहराचे भुषण असणारे ▶▶ पान २ वर...

## पोलीसांच्या सतर्कतेमुळे वाहनचालकाचे वाचले प्राण



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : युसूफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतल मांगवडगाव फाटा परिसरात ट्रकचा अपघात झाला होता. याच परिसरातून जाणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक मांजरे, पो.उप.नि.बर्डे यांनी तात्काळ परिसरातील नागरिकांची मदत घेवून वाहनचालकांना त्याठिकाणाहून काढले व उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. पोलीसांच्या सतर्कतेमुळे संबंधित वाहनचालकांचे प्राण वाचले.

रविवारी रात्री ११ च्या सुमारास मांगवडगाव फाटा पुलावरील दोन मोटार सायकल च्या अपघात स्थळी भेट देऊन मांजरे, बर्डे, पोह शेंडगे, पोअ गायकवाड असे शासकीय वाहनाने पो स्टे युसुफ वडगाव कडे येत असताना सुकळी फाटा च्या थोडं पुढे एक ट्रक रस्त्याच्या खाली खड्यात गेलेला दिसला... आम्ही गाडी थांबून पाहिले असता ट्रक मध्ये.कलर चे बकेट होत्या..व गाडीची ड्रायव्हर केबिन पूर्ण ▶▶ पान २ वर...

## माजी मंत्री क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई पांगारकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर वय ७९ वर्ष यांचे आज दि २२ रोजी प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.

माजी नगरसेवक सुनिल पांगारकर आणि डॉ.गणेश पांगारकर यांच्या मातोश्री श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर या काही महिन्यांपासून आजारी होत्या, त्यांच्यावर बीड येथेच उपचार सुरू होते. आज दि.२२ रोजी पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुलं, पाच मुली, सुना नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर दुपारी ३ वा. श्री भगवान बाबा प्रतिष्ठान



जवळील अमरधाम येथे अंत्यविधी होणार आहे. श्रीमती पुष्पाताई या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या बरोबरच, राजकीय. धार्मिक. सामाजिक आणि सांप्रदायिक कार्यक्रमात सहभागी असायच्या त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## १४० कोटींचे सिमेंट रस्ते पण धोकादायक रोहित्रे-खांब मधोमध अपघाताला निमंत्रण

**'सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा' लक्ष्यवेधी आंदोलन -डॉ. ढवळे**

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त बीड येथे आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत रेल्वे स्टेशन शुभारंभाचा कार्यक्रम पार पडला. या मार्गावरील धोकादायक रोहित्र प्रशासनाने फक्त मंडपाच्या कपड्याने झाकून ठेवले होते. त्यामुळे प्रशासनाची नामुष्की झाली आणि रोहित्रांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी आज (दि.२२





सप्टेंबर) सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ''सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा'' हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात रामनाथ खोड, अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप) ,रामधन जमाले जिल्हाध्यक्ष (इंटक), बाळासाहेब मोरे पाटील, प्रदेशाध्यक्ष ▶▶ पान २ वर...

# ‘आयटी’ चिंता...

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व जगावर नुकताच एक अणुबॉम्ब टाकला आहे. तो जपानवर अमेरिकेने टाकलेल्या अणुबॉम्बपेक्षा भयानक आहे. तो बॉम्ब म्हणजे, एचवनबी व्हिसाच्या मूल्यात अमेरिकेने म्हणजे ट्रम्प यांनी तब्बल १ लाख डॉलर्स म्हणजे ८८ लाख रूपये एवढी वाढ केली आहे. अमेरिकेत जाऊन नोकऱ्या मिळवण्याची आणि तेथे अफाट पैसा कमावण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना या निर्णयामुळे चांगलाच तडाखा बसला आहे. १९९१ साली




जेव्हा भारतीय क्षेत्र जगाला खुले झाले तेव्हा त्याचा सर्वात जास्त फायदा मध्यमवर्गीयांनी उचलला. यामुळे हा मध्यमवर्ग सर्वात ताकदवान झाला. आर्थिक उदारीकरणानंतर, कित्येक मध्यमवर्गीय तरुण अमेरिकेच्या मार्गाला लागले. आयटी क्षेत्र त्यांच्यासाठी नवीन दालन उघडणारे ठरले. कित्येक तरुण आज डॉलर्समध्ये पगार घेऊ लागले. एक काळ तर असा आला की, अमेरिकन अध्यक्ष कोण हे देखील तेथील इंडियन ठरवू लागले. याचीच सल बहुधा ट्रम्प महाशयांना बोचत असेल. अमेरिकेतील काही कंपन्या अशा आहेत की, त्यांना तेथील स्थानिक लोकांना नोकरीवर ठेवणे परवडत नाही. कारण स्थानिक अमेरिकन लोकांच्या मागण्या भारतीय तरुणांपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे नोकरीसाठी भारतीय तरुणांनाच प्राधान्य देण्यात आले. अमेरिकेच्या मनात याबाबत विषाद दिसून येतो आणि तोच ट्रम्प यांच्याही मनात असावा. त्यामुळे त्यांनी नव्या व्हिसा धारकांना १ लाख डॉलर्स इतके जबर शुल्क आकारले आहे. यात एक दिलासा आहे तो म्हणजे, सध्या जे अमेरिकत आहेत आणि तेथे नोकऱ्या करत आहेत त्यांना ही शुल्कवाढ लागू नाही. केवळ नवीन व्हिसा धारण करून अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्यांसाठीच ही शुल्कवाढ लागू आहे. त्यामुळे हा दिलासा असला तरीही ट्रम्प यांच्या निर्णयामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारतातील आयटी क्षेत्रात नोकऱ्यांची लाट उसळण्याची शक्यता आहे. कारण अमेरिकेतील ऑनसाईट जॉब महागले असल्याने भारतातील सेवा पुरवठादार कंपन्या युरोपियन देशांकडून हे जॉब करून घेण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तर, आयटी क्षेत्रासाठी मोठे पॅकेज जाहीर करणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पण या निर्णयाचा बूमरँग अमेरिकेवर उलटू शकतो असेही काही तज्ज्ञांचे मत आहे. कारण या निर्णयाचा अमेरिकेच्या नवोन्मेष म्हणजे ईनोव्हेशन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. भारतीय आयटी सर्व्हीस प्रोव्हायडर्स इतर देशांकडून किंवा युरोपियन देशांतील तरुणांकडून रोजगाराचा लाभ घेतील असा हा भारतासाठी दुसरा चांगला परिणाम आहे. ट्रम्प यांच्या या एकाच निर्णयामुळे भारताच्या नोकरी क्षेत्रात उसळी येण्याची शक्यता आहे. कुशल मनुष्यबळाला अमेरिकेत येण्यास संधी नाकारली जात आहे आणि त्याचा परिणाम भारतीय तरुणांना अमेरिकेत नाहीत तर अन्यत्र नोकऱ्यांची संधी निर्माण होण्याची शक्यता आहे; परंतु हा निर्णय भारतातील कुशल मनुष्यबळाला एक तडाखा आहे. भारतीय तरुण हे अमेरिकन तरुणांपेक्षा जास्त कुशल आहेत आणि त्यांच्यापेक्षा कितीतरी कमी किमतीत काम करण्यास तयार होतात. यामुळे ट्रम्प यांनी हा कुटिल डाव खेळला आहे. आतापासूनच हा निर्णय अमलात येत आहे. भारतीय आयटी कंपन्यांवर या निर्णयाचा निश्चितच वाईट परिणाम होणार आहे. कारण जे कर्मचारी या व्हिसावर अवलंबून आहेत त्यांना उच्च किमतीचा सामना करावा लागेल. त्यामुळे टीसीएस आणि इन्फोसिससारख्या कंपन्या अडचणीत येऊ शकतात. पण असे असले तरीही सिल्व्हर लायनिंगप्रमाणे या संकटातही सुखद बाजू ही आहे की इतर देशांतून विशेषतः युरोपियन कंपन्यांत भारताला संधी आहे आणि ती आता गमावून चालणार नाही. या निर्णयाचा दुसरा एक परिणाम होणार आहे तो म्हणजे आता ऑटोमेशन आणि न्यू एन्ट्रंन्टसना संधी कमी असतील. तशाही त्या एआयमुळे कमी झाल्याच होत्या. ती प्रक्रिया आता अधिक गतिमान होईल. त्यामुळे आयटी क्षेत्रातील नव्याने पदार्पण करणाऱ्यांना संधी कमी होतील. त्याना अधिक प्रमाणात आपली क्षमता सिद्ध करावी लागेल, इतकेच नव्हे तर पूर्वीसारखे जे जॉब्स मिळाले की आयुष्यभर तेथेच राहून सारे लाभ घेत राहायचे ही वृत्ती संपून जाईल. कारण अमेरिकन निर्णयामुळेच नव्हे तर एआयमुळेच या प्रवृत्तीला शेवटचा घाव बसला होता. आता तो अधिकच गतिमान झाला आहे. अमेरिकेच्या निर्णयाचा सकारात्मक परिणाम झाला आहे तो असा की बंगळूरु आणि गुरूग्राम येथील टेक कंपन्यांकडे अधिक तरुणांचा ओढा वळेल. कारण अमेरिकेची दारे बंद झाली तर साहजिकच हैदराबाद आणि बंगळूरु यासारख्या टेक सिटीजकडे तरुणांचा प्रवाह पुन्हा चालता होईल. पूर्वी जो तो अमेरिकेला जाण्याचे स्वप्न पाहात असे आणि त्यात यशस्वी होत असे. आता ते राहिले नाही तर त्या उलट अमेरिकेपेक्षा अन्य ठिकाणी जाण्याकडे या तरुणांचा कल असेल. ट्रम्प यांनी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. कारण त्याचे परिणाम ट्रम्प प्रशासनाला भोगावे लागणार आहेत. काही दिवस चिंता वाटेल पण भारतीय या संकटावर मात करतील आणि निर्णयाचे भूत गाडून टाकतील यात काही शंका नाही.

# दुरवस्था उड्डाणपुलांची, कोंडी मुंबईकरांची

गेल्याच आठवड्यात मुंबईतील एक महत्त्वाचा उड्डाणपूल बंद झाला. हा पूल बंद झाल्यामुळे मुंबईकरांच्या त्रासात आणखी एक भर पडली आहे. एकीकडे मुंबईत वाहनांची संख्या मागील पाच वर्षांत दहा पटीने वाढत आहे. तर दुसरीकडे पायाभूत सुविधांसाठी, विकासकामांसाठी मेट्रोच्या कामांसाठी रस्ते खोदून ठेवल्याने तर काही ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडल्याने मुंबईतल्या अनेक ठिकाणांवरची वाहतूक कासवगतीने सुरू आहे. मुंबईतल्या अनेक मार्गांवर वाहतूक कोंडीची बेटे तयार झाली आहेत. त्यात आता जुने ब्रिटिशकालीन उड्डाणपूल धोकादायक ठरत असल्याने एकेक करून बंद करावे लागत असल्याने मुंबईकरांची दिवसेंदिवस आणखीनच कोंडी वाढत आहे. या वाहतूक कोंडीचा त्रास कमी करण्यासाठी देशातल्या आर्थिक राजधानीत वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्याची गरज नसून आता एक व्यापक इलाजाची गरज निर्माण झाली आहे. यात पुलांची कोंडी होत नसून मुंबईकरांची कोंडी होत आहे.

यापूर्वीच मुंबईतील असंख्य उड्डाणपूल दुरुस्ती करता अथवा पूर्णपणे बंद करण्यात आलेले आहेत. त्यात घाटकोपर लक्ष्मीनाला पूल. मुंबई सेंट्रल स्थानकाबाहेरील बेलासिस पूल, मुख्य वर्दळीचा सायनचा पूल, ओशिवरा पूल असे असंख्य पूल बंद झाल्यामुळे सर्वत्र वाहतूक कोंडी होत आहे. हे उड्डाणपूल बंद झाल्याने त्याचा फटका दुसऱ्या उड्डाणपुलांना बसत आहे आणि तेथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. मुंबईकर आधीच या खूप मोठ्या वाहतूक कोंडीमुळे अस्वस्थ झाला आहे. एमएमआर विभागात म्हणजेच नियोजन न करता बांधत गेलेल्या महानगरात म्हणजेच ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेलसारख्या भागात तर अत्यंत दयनीय अवस्था आहे. मुंबई शहरातील असे असंख्य उड्डाणपूल बंद झाल्याने त्याचा फटका रोज कामावर ये-जा करणाऱ्या नोकरदार वर्गाला तसेच शाळा, रुग्णवाहिका यांनाही बसत आहे. ही वाहतूक कोंडी मुंबईकरांच्या नशिबी होती त्यातच



मुंबईतील जीवनवाहिनी म्हणजे रेल्वेच्या रोज बिघडत चाललेल्या वेळापत्रकामुळे मुंबईकर चाकरमानी अक्षरशः पिचून गेले आहेत. दर रविवारी मेगाब्लॉक घेऊनही दररोज उशिरा चालणाऱ्या रेल्वे गाड्या त्यामुळे लेटमार्क मुंबईकरांच्या पाचवीलाच पूजले आहे. त्यातच रेल्वे गाड्यांमध्ये होणारी प्रचंड गर्दी, त्यातून वाट काढून रस्त्यावर आले तर वाहतुकीची कोंडी यामुळे मुंबईकर अक्षरशः थकून गेला आहे. आता पावसाचा मुक्काम तर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यात एक दिवस कधीतरी इतका पाऊस पडतो की मुंबईकरांना अक्षरशः ठप्प करून सोडतो. रस्त्यावरील चिखल, फेरीवाले त्यात पावसामुळे होणारे खड्डे तसेच पावसाळी आजारांनी तर मुंबईकरांची कधीच पाठ सोडली नाही. अशातच मुंबईकरांना रोज साधारण दोन ते अडीच तास वाहतूक कोंडीत घालवावे लागत आहेत. वाहतूक कोंडीत सगळेच मुंबईकर अडकले आहेत. चाकरमानीही आणि उच्चभ्रूही. त्यात कधी मेट्रो रुसून बसते, तर भार सहन न झाल्यामुळे मोनोरेल बंद पडत आहे. कधी रिक्षावाला नकार देतात तर कधी टॅक्सीवाले उर्मट वागतात. सध्या मेट्रो प्रवाशांच्या पसंतीस उतरू लागली आहे. मात्र मेट्रो पकडायला जाण्यासाठीही द्राविडी प्राणायामच करावा लागतो. त्यानंतर पुन्हा त्या मेट्रोतून उतरून आपल्या स्थळी जाणे. हेही एक मुंबईकरांपुढे मोठे दिव्यच आहे. मुंबईतील दिवसेंदिवस वाढत जाणारे लोंढे काही कमी होत नाही व्यापार संकुलेही विभागली तरी परिस्थिती ‘जैसे थे’च राहते. कोणतेही नियोजन न करता मुंबईचा आडवा उभा विकास सुरू आहे मात्र सध्या सरकारी धोरणाप्रमाणे इतर सर्व बाबी दुर्लक्षून ‘मेट्रो एके मेट्रो’ असा जयघोष सुरू आहे. मात्र त्या मेट्रोला ही मर्यादा आहेत हे विसरून चालणार नाही. मुंबईच्या बेस्ट सेवेची वाताहत पाहिली तर आपण कुठे चाललो आहोत याचा प्रश्न पडतो. कोणे एकेकाळी रेल्वेनंतर बेस्ट बससेवा हा शेवटच्या टोकापर्यंत जाणाऱ्या प्रवाशांना मोठा आधार होता. रस्त्यावरील वाहतूकही कमी असल्यामुळे बेस्ट बस अगदी वेळेचे तंतोतंत पालन करून चालवली जात असे. मात्र गेल्या काही वर्षांत बेस्ट प्रशासनाकडे झालेले सरकारचे पूर्णतः दुर्लक्ष यामुळे या चांगल्या सेवेला घरघर लागली. आज कमी होत गेलेली बेस्ट बसची संख्या व खासगीकरणाने दर्जा व प्रतिष्ठा गमावून बसलेली बससेवा पाहिली तर, एक दर्जेदार सेवेचे झालेले वाटोळे पाहून जुने प्रवासी दुःखी होतात. आज बेस्ट बसचे भाडे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने लाखो लोकांनी आज बेस्ट बसचा पर्याय सोडून दिला आहे. कोरोना काळात, बेस्ट बस तसेच रेल्वेने प्रवास नव्हता म्हणून कित्येकांनी दुचाकी खरेदी केल्या. मुंबईच्या रस्त्यांवर दुचाकींचा सुळसुळाट दिसून येतो. पण त्यांचे रस्त्यावरील बेशिस्तपणे चालवणे पाहून आता कोणीतरी या दुचाकीस्वारांना आवरा म्हणण्याची वेळ येऊन ठेपली आहे. मात्र सार्वजनिक सेवांना प्राधान्य न देता खासगी गाड्यांना प्राधान्य दिले की शहराचे गणित बिघडते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई शहर आहे. दक्षिण मुंबईत येण्यासाठी पूर्व मुक्त मार्ग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग व आता छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्गे विनाअडथळ्यांनी शहरात येता येते. मात्र ते शेवटी संपतात मुंबई शहरातच... त्यामुळे मुंबई शहरात म्हणजेच दक्षिण मुंबईत प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याचे आढळते. म्हणजे यातही कोणतेही नियोजन न करता एका शहराची विपन्नावस्थाच झालेली दिसून येते. वाहतूक कोंडी तर पाचवीला पूजलेली आहेच, आता यात मुंबईतील महत्त्वाचे उड्डाणपूल बंद झाल्याने ही कोंडी उड्डाणपुलांची नसून ही कोंडी आता खऱ्या अर्थाने मुंबईकरांची झाली आहे.

पान १/४ वरून

## रिपाईच्या महाधरणे

देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उताऱ्यावर असणाऱ्या पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे. आदी प्रमुख मागण्याचे शासन स्तरावर पूर्तता करण्यासाठी मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर रिपाइंच्या वतीने करण्यात येणाऱ्या महाधरणे आंदोलनात गायरान धारकांसह शहरातील रिपाइं पक्षाधिकारी, महिला व कार्यकर्ते यांच्यासह घरकुल धारक यांनी हजारोच्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन युवा तालुका सचिव रवींद्र वीर यांनी केले आहे

## कालिकादेवी विद्यालय बुद्धिबळ

जिल्हास्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत, प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## आज जरुड येथे आई

आराधी मंडळे व महिला बचत गट सहभागी होणार असून, कीर्तन-भजन-आराद्याचा अखंड जलसा रंगणार आहे. संघर्षयोध्दा मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील व अनेक मान्यवर संत-महंतांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त गावकरी मंडळींनी केले असून, गावातील तरुण, मंडळी व महिला बचत गट मोठ्या उत्साहाने तयारीत सहभागी झाले आहेत. या महोत्सवाच्या निमित्ताने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, हजारो भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या कीर्तन महोत्सवाचे आयोजन माऊली महाराज जरुडकर यांच्या नियोजनाखाली व गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागात करण्यात आले असून, त्यामुळे कार्यक्रमात भक्तिमय वातावरण अधिक उत्स्फूर्त झाले आहे.

## राजकीय नेत्यांच्या वाढदिवसाला

३ से.मी. तलवार लाल पांढरे व चॉकलेटी कपड्याचे मॅन मध्ये असलेली लोखंडी तलवार जिची धारदार असलेली व समोर टोकदार असलेली व समोरील बाजुचे पाते रुंदीचे तलवार पाते ची लांबी ६३ से.मी. एका बाजुस मुठ असलेली जुनी वापरती वरील वर्णनाची व किंमती तलवार मिळुन आल्याने तिचा दोन पंचा समक्ष जागीच पंचनामा करुन त्यावर आमचे व पंचाचे सहीच्या चिठ्या लावुन जप्त करुन ताब्यात घेतले. सदर चा पंचनामा लाईटच्या तरी भगवाना उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे पिंपळगाव माजरा याने विनापरवाना बेकायदेशिर रित्या घातकशस्त्र धारदार तलवार बाळगली म्हणून त्याच्या विरुद्ध आर्म एक्ट चे कलम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला व मा न्यायालयात आरोपीस अटक करून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर सदर प्रकरनात मा.न्यायालयात सरकार पक्षातर्फे एकून पाच साक्षीदार तपासण्यात आले .आरोपीचे वकील ॲड. योगेश टेकाडे यांनी घेतलेला बचाव व केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून मा.न्यायाधीश अल्का भास्कर निवारे मॅडम यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपी भागवत खांडे तर्फे ॲड .योगेश टेकाडे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.वैभव होळकर यांनी सहकार्य केले..

## शिक्षकांच्या निरोपसमारंभा

आठवणीत अनेकांच्या डोळ्यात अश्रु तरळत होते.

फुलांच्या रस्त्यात वाट लावतांना अनेकांच्या पापण्या ओल्या झाल्या.सर्वांना स्नेहभोजनाचे आयोजन यानिमित करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी गावाचे लोकप्रिय सरपंच श्री.नंदकिशोर मोरे, ग्रामपंचायत सदस्य श्री.सुदर्शन दादा मोरे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री दिपक मोरे, उपाध्यक्ष श्री.सुनिल मोरे,रोजगारसेवक दत्ता महाराज मोरे सह गावातील असंख्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.या शिक्षकांच्या कार्याचा गुणगौरव शब्दांतुन अनेकांनी व्यक्त केल्या याप्रसंगी अनेकांचे डोळे अश्रुंनी भिजले.शिक्षकांनीही गावातील नागरिक, विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी नागरिकांचे आभार व्यक्त केले.गावकरी मंडळीनी शाल -श्रीफळ देवुन या सर्व शिक्षकांना हळव्या भावनेत निरोप दिला.गावकरी बांधवाच्या निरोपांने शिक्षकही भारावुन गेल्याचे चित्र यावेळी दिसले.

## बीड रेल्वे स्थानकाला

असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

पान १/४ वरून

बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर आंबेडकरांचे नाव देण्यात यावे यासाठी आता सर्व आंबडकरी जनता मागणी करणार असून येत्या काळात हा लढा आणखी तीव्र होणार आहे असे दिसत असून,केंद्र,राज्यसरकारने व प्रशासनाने यांची तत्काळ दखल देऊन बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी होत आहे.

## त्याग, सेवा आणि

जात नाही, पात नाही फक्त माणुसकीच, हा त्यांचा ध्यास आहे. म्हणूनच आज प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल कृतज्ञता, आपुलकी आणि अभिमान आहे.आज बीडच्या गल्लीबोळांतून, प्रत्येक घराघरांतून ‘‘आमच्या ताईंचं अभिनंदन असो!’’ असा गजर सुरू झाला आहे. ज्यांनी आपल्या जीवनाला समाजासाठी वाहिलं, त्यांना मिळालेला हा मानाचा बहुमान म्हणजे खरं तर संपूर्ण जिल्ह्याच्या धडधडत्या हृदयाचा गौरव आहे असा म्हणलं तर तो चुकीचा ठरणार नाही..!

## गेवराई बाजार समितीच्या

भागाण चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या आणि सर्व सामान्य तसेच विविध जाती धर्मातील कार्यकर्त्यांला पदावर सन्मान करण्याची आपली भुमिका आहे, आणि त्यात कसलाही किंतू परंतु नाही. सर्वांना विश्वासात घेऊन आपण ही निवड केली आहे.

गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती ही मानाची संस्था आहे. एक रुपयाचेही कर्ज आपल्या बाजार समितीवर नाही. शेतीसाठी खुप कामे करायचे आहे. बाजार समितीत कोल्ड स्टोरेज सुरु करायचे आहे. बाजार समितीत शेतीची वारंवार चर्चा होण्यासाठी एक नवे दालन सुरु करणार आहोत. राजकीय चर्चेशिवाय शेती मातीची आणि शेतकरी हिताची चर्चा व्हावी हीच आली भुमिका आहे. आपण जर प्रामाणिकणे काम केले तर विधानसभा निवडणुकीत मतदारांनी टाकलेल्या विश्वास आपण सार्थ करु. पाऊस आणि पुरग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. आता भेदभाव करायचा नाही. अडचणीतल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्याला मदत करायची आहे. सर्व शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत असे सांगून कुणीही धिर सोडू नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा प्रयत्न शिवछत्र परिवार करत आहे ---आ. विजयसिंह पंडित

याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, सर्व संस्थांमध्ये शिवछत्र परिवाराने सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा कायम प्रयत्न केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व आपल्याकडे आहे, आपली जबाबदारी वाढली आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी शेतमजूर यांना दिलासा आणि आधार देण्याचे काम करायचे आहे. जाती जाती जातीमध्ये तेढ निर्माण करुन शिवछत्र परिवाराला बदनाम करण्याचे काम कांहीं लोक करत आहेत, त्यांचा कुटील डाव हानून पाडावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले

मी सभापती झालो, यावर विश्वास बसत नाही --- जगन्नाथ काळे

याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे म्हणाले की, आज मी सभापती झालो यावर विश्वास बसत नाही. आमचे नेते अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास आपण सार्थ करु असेही ते म्हणाले.

उपकार कधीही विसरणार नाही ---उपसभापती श्रीहरी पवार

माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आपण प्रामाणिक आणि निष्ठेने काम करु. माझ्यासारख्या सामान्य माणसालाला शिवछत्र परिवाराने सर्वात मोठ्या पदावर बसवले. शिवछत्र परिवाराचे उपकार आण कधीच विसरणार नाही असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी माजी सभापती मुजिब पठाण यांनीही मनोगत व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी बाजार समितीचे संचालक अशोक नाईकवाडे, पांडुरंग मुळे, रामलाल धस, हनुमान कोकणे, महारुद्र चाळक, बाबासाहेब जाधव, रमेश साखरे, अशोक खरात, रमेश खोपडे, मंगेश कांबळे, दिलीपकुमार जैन, राम चाळक, कृष्णा राऊत, सौ.वैशाली जाधव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माँ वैष्णोदेवी मंदिरात

व महाराष्ट्रातील एकमेव असणारे वैष्णोदेवी मंदिर भक्तांचे श्रद्धास्थान आहे. प्रत्यक्ष वैष्णोदेवी मंदिर प्रमाणे हुबेहुब असणारे हे मंदिर जागृत देवस्थान म्हणुन प्रसिद्ध आहे.

पान १/४ वरून

दरवर्षी नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम संस्थान तर्फे आयोजित करण्यात येतात याही वर्षी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर व बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमान नवनीतजी कॉवत साहेब यांच्या शुभहस्ते घटस्थापना करण्यात आली. तसेच सप्तमीला तीन दिवसीय नवचंडी याग, नवदुर्गा पुजन व नवमीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व कार्यक्रमास भक्तजणांनी उपस्थित राहावे असे आव्हान संस्थापक अध्यक्ष श्री संतोष सोहनी यांनी केले आहे. नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभुमीवर मंदिराची डागडुजी, कलर काम, विद्युत रोषनाई, मंडप आदि कामे पुर्ण झाली असुन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नवरात्र उत्सव मोठ्या जल्लोशात साजरा करण्यात येणार आहे.

नित्यनियमाप्रमाणे दररोज सकाळी ७ वाजता व संध्याकाळी ७ वाजता महाआरती व रात्री ९ वाजता शयन आरती चे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भक्तजनांनी आरती चा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर संस्थान तर्फे संस्थानचे अध्यक्ष श्री संतोष सोहनी, कोषाध्यक्ष श्री संजय सोहनी, विश्वस्त शिवप्रसाद दायमा, गोविंद तोष्णीवाल, पवन शर्मा, मोहित कासट इ. यांनी केले आहे.

भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा : संतोष सोहनी

बीड शहरासह जिल्हाभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या माता वैष्णोदेवी मंदिर येथे नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली असून बीड शहरासह जिल्हाभरातील भाविक भक्तांनी दर्शनाचा महाआरतीचा लाभ घ्यावा असे आवाहन माता वैष्णोदेवी मंदिर संस्थांचे संस्थापक अध्यक्ष संतोष सोहनी यांनी केले आहे.

## १४० कोटींचे सिमेंट रस्ते पण

शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच , स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व सखाराम बेंगडे सचिव (इंटक), शेख मुस्ताक,शेख मुबीन, नागरिक युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

१४० कोटींचे रस्ते, पण रोहित्रे जागेवरच!

नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेतून टप्पा क्रमांक १ मध्ये ७० कोटी आणि टप्पा क्रमांक २ मध्ये ६९ कोटी असे एकूण १४० कोटी रुपयांचे ६० फुट रुंदीचे सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली. मात्र या कामांदरम्यान महावितरणचे विजेचे खांब व रोहित्र स्थलांतरित करण्यासाठी निधीची तरतूद न झाल्याने ते रस्त्यांच्या मध्यभागीच राहिले. परिणामी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढत आहे.

नगरपालिका व महावितरण एकमेकांवर जबाबदारी ढकलत असताना नागरिक मात्र जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. विशेषतः नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावर, तुळजाई चौक व एसबीआय बँकेजवळील रोहित्र गंभीर धोक्याचे कारण बनले आहेत.

उघडी उपकरणे अपघातास आमंत्रण

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, राजीव गांधी चौक, बार्शी नाका, केएसके महाविद्यालय, सुभाष रोड, जुने एसपी कार्यालय, कंकालेश्वर मंदिर व साठे चौक या भागांत जमिनीलगत असलेली उघडी उपकरणे, मोडकळीस आलेली रोहित्रे व फ्युज बॉक्स नागरिक व जनावरांच्या जीविताला सतत धोका निर्माण करीत आहेत.

३ कोटी निधीची मागणी

बीड शहरातील १५७ वीज खांब व १७ रोहित्रे सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी किमान ३ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून तो जिल्हा नियोजन समितीमार्फत उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली.

## पोलीसांच्या सतर्कतेमुळे

दबलेली होती... आम्ही आवाज देऊन पाहिले असता.. आतून एक व्यक्ती कण्हत होता... आम्हाला जाणीव झाली की. सदर ड्रायव्हर हा जिवंत आहे... आम्ही तात्काळ खाली उतरुन... आसपास चे लोकांची मदत घेऊन..वरून रिमझिम पाऊस चालू होता.जेसीबी बोलाऊन सर्व ट्रक मधील माल खाली केला... केबिन पूर्ण तोडली... त्यात चालक जिवंत होता... पण..तो पूर्ण स्टिअरिंग व पाठीमागील माल यात दबला होता,त्यास अत्यंत शिताफीने त्यातून बाहेर काढले.. व अँब्युलन्स ने अंबाजोगाई येथे पुढील उपचार कामी हॉस्पिटल ला पाठवले.. सदर पूर्ण घटना ही साधारण ३ ते ४.. तास चालली... स्थानिक लोकांनी देखील खूप मदत केली... सविनय सादर...

# विश्वास आणि पारदर्शकतेच्या बळावरच संस्थेची प्रगती - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड प्रतिनिधी :-स्व.काकूंनी लावलेल्या छोट्याशा रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्थेच्या या यशामागे जनतेने दाखवलेला विश्वास आणि आमचा पारदर्शक कारभार हाच खरा आधार आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

श्री गजानन नागरी सहकारी बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या.बीड यांच्या संयुक्त वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास बडगे हे होते. यावेळी व्यासपीठावर दिनकर कदम, अरुण डाके, प्रा. जगदीश काळे, नानासाहेब काकडे, मुखीद लाला, गणपत डोईफोडे, दिलीप खिस्ती, भागवत तावरे, डॉ.अरुण भस्मे, डॉ.राजा मचाले, अरुण गोरे, सुधाकर मिसाळ, अंकुश राठोड, सखाराम मस्के, अरुण बोंगाणे, सुभाष क्षीरसागर, ॲड.राजेश तांगडे, शुभम बरकसे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गजानन बँकेच्या १० शाखा आज सर्वसामान्यांना मदतीचा हात देत आहेत. २०२४ पर्यंत बँकेने आठ प्रथम पारितोषिके मिळवली आहेत. गतवर्षी बँकेच्या ठेवी १०० कोटी होत्या, तर यावर्षी त्या १२८ कोटींवर पोहोचल्या आहेत. या वाढत्या आर्थिक सामर्थ्यामुळे कर्ज मर्यादा ३ लाखांवरून थेट ७ लाखांपर्यंत



वाढविण्यात आली आहे. विश्वास, गुणवत्ता आणि प्रामाणिकतेच्या जोरावर श्री गजानन नागरी सहकारी बँक व आदर्श शिक्षण संस्था पतपेढी प्रगतीपथावर वाटचाल करत आहेत. गुणवत्ता व मेरिटच्या आधारे सेवेत पारदर्शकता वाढवण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. सध्या ७०० हून अधिक कर्मचारी बँकेत कार्यरत आहेत. केवळ आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी कर्ज मिळावे म्हणून बँकेचा वापर करण्याऐवजी आता सभासदांना विमा सुविधा देखील बँकेमार्फत पुरविल्या जात आहेत. गेल्या आर्थिक वर्षात बँकेने ११० कोटी रुपयांचा नफा मिळविला असून या यशामागे सभासदांचा विश्वास आणि आमच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता हेच घटक महत्त्वाचे आहेत.असे ते म्हणाले. या कार्यक्रमात श्री गजानन नागरी सहकारी बँक चौसाळा शाखेला उत्कृष्ट शाखा पुरस्कार मिळाल्याबद्दल अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. गजानन नागरी सहकारी बँकेचा वार्षिक अहवाल उपाध्यक्ष प्रा.जगदीश काळे यांनी सादर केला. तर आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीचा अहवाल चेअरमन अण्णासाहेब थिटे यांनी वाचला.

यावप्रसंगी एम.ए.राऊत, प्रकाश राठोड, दिलीप शेळके, नवनाथ कुलकर्णी, कलंदर पठाण यांच्यासह श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी तसेच आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीचे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.श्रीकांत कुलकर्णी यांनी मानले.

## हिंदी भाषा रोजगार की भाषा हैं प्रा.जयंत साठे
## सौ.के.एस.के.महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा

बीड प्रतिनिधी : सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये हिंदी विभागाच्या वतीने हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सप्ताहाच्या समारोह प्रसंगी मुख्यकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख वक्ते प्रा.जयंत साठे यांनी विचार मांडताना म्हणाले की, हिंदी भाषा जगामध्ये बोलली जाणारी व शिकली जाणारी प्रमुख भाषा आहे.हिंदी भाषेचे शब्द भांडार प्रचंड असून तिच्यामध्ये माधुर्य आहे. हिंदी भाषा ज्ञान भाषा असून ती रोजगार देण्यासाठी सक्षम भाषा आहे. त्यामुळेच हिंदी भारतदेशाची राष्ट्रभाषा आहे. ही भाषा संपूर्ण भारतदेशामध्ये बोलली आणि शिकली जाणारी भाषा आहे. तिचे ज्ञान भांडार विस्तीर्ण असून देशामध्ये प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे होते.त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, भाषेचे महत्व समजावून सांगताना हिंदी भाषा देशाची एकता व अखंडता जपून ठेवते असे प्रतिपादन केले. आज इलेक्ट्रॉनिक्स मेडियामध्ये व सोशल मेडियामध्ये विविध पैलू उपलब्ध असून त्याचा नव्या पिढीने जाणीव पूर्वक वापर करणे काळाची गरज आहे. इंटरनेटच्या मायाजाळामध्ये सकारात्मक आणि उपयोगी माध्यमे शोधून त्याचा अवलंब विद्यार्थ्यांनी करायला हवा.

हिंदी भाषा ही अत्यंत मधूर आणि गोड भाषा आहे.शिवाय या भाषेमध्ये भरपूर साहित्य उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांनी ते साहित्य वाचण्याची आणि आत्मसात करण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले.हिंदी सप्ताह अंतर्गत हिंदी विभागाच्या वतीने निबंध लेखन,सुंदर हस्ताक्षर, काव्यपठन,भाषण प्रतियोगिता,हिंदी फिल्मी गीत गायन प्रतियोगिता या स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रोफसर डॉ.आबासाहेब राठोड यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ.शितल इगडे यांनी केले तर आभार डॉ.प्रकाश गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ.राहूल सोनवणे आदीसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जरुड येथे आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सवाचे आयोजन
## आज ह.भ.प शांतिब्रह्म नवनाथ महाराज यांचे कीर्तन

बीड प्रतिनिधी
तालुक्यातील जरुड (ता. बीड) येथे सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत व विविध संत-महंतांच्या आशिर्वादाने आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सव सोमवारी (दि.२२ सप्टेंबर) उत्साहात सुरुवात होत आहे.हा महोत्सव मंगळवार दि. ३० सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. या कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन ह.भ.प. शांतीब्रह्म नवनाथ महाराज (गोरक्षनाथ टेकडी) व ह.भ.प. अखंडानंद गिरीजी महाराज (श्रीक्षेत्र भवानीगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्यभरातील मान्यवर कीर्तनकार व संत सहभागी होत असून, भाविक भक्तांसाठी अध्यात्मिक मेजवानी उपलब्ध झाली आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. स्वरमुर्ती रामेश्वर महाराज शास्त्री (लोणी शहाजनपूर), ह.भ.प. प्रतिभाताई गायकवाड, ह.भ.प. भागवताचार्य नवनाथ महाराज नाईकवाडे, ह.भ.प. युवाकीर्तनकार माऊली महाराज, ह.भ.प. बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते, ह.भ.प. सिताताई आवाड, ह.भ.प. भगवंत महाराज पुरी, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे यांच्यासह अनेक मान्यवर कीर्तनकारांचे कीर्तन सेवा होणार आहे. तसेच बुधवार दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी ह.भ.प.परमपूज्य गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे श्री क्षेत्र बंकट स्वामी मठ संस्थान नेकनूर आळंदी पंढरपूर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.



तसेच या महोत्सवात विविध भजनी मंडळे, आराधी मंडळे व महिला बचत गट सहभागी होणार असून, कीर्तन-भजन-आराध्याचा अखंड जलसा रंगणार आहे. संघर्षयोध्दा मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील व अनेक मान्यवर संत-महंतांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त गावकरी मंडळींनी केले असून, गावातील तरुण, मंडळी व महिला बचत गट मोठ्या उत्साहाने तयारीत सहभागी झाले आहेत. या महोत्सवाच्या निमित्ताने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, हजारो भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या कीर्तन महोत्सवाचे आयोजन माऊली महाराज जरुडकर यांच्या नियोजनाखाली व गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागात करण्यात आले असून, त्यामुळे कार्यक्रमात भक्तिमय वातावरण अधिक उत्स्फूर्त झाले आहे.

## शिवसेना व देवसेना संपर्क कार्यालय, धानोरा रोड येथे
## अनिल भंडाणे व अजय बहिरवाळ यांचा सत्कार सोहळा संपन्न

बीड प्रतिनिधी -शिवसेना व देवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि गुजर समाजाच्या वतीने धानोरा रोडवरील संपर्क कार्यालयात मांडवजाळी गावचे सुपुत्र अनिल हनुमान भंडाणे व अजय गीता जी बहिरवाळ यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

अनिल भंडाणे यांची महाराष्ट्र राखीव पोलीस दलात अहिल्यानगर येथे निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अजय बहिरवाळ याने शालेय कुस्ती स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवत तालुकास्तरीय निवड मिळवली, याबद्दल त्याचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बहिरवाळ सर यांनी सांगितले की, ''गुजर समाज आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाही. आपली संख्या, ताकद आणि संघटन देशभर पसरले आहे. समाजामध्ये आमदार, खासदार आणि मंत्रीसुद्धा आहेत. समाजाच्या युवकांचा असा सन्मान होत असल्याचे बघून खूप समाधान वाटते.'' गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ यांनी लाल मातीतील पैलवानांची आठवण करून देत सांगितले, ''आपले पैलवान राज्यभर गाजत आहेत, पण अजून महाराष्ट्र केसरीचा किताब आपल्याला मिळवायचा आहे. त्यासाठी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे.'' देवसेना गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले, ''समाजातील तरुणांचा गौरव केल्यामुळे आमच्या कार्यास प्रेरणा मिळते. समाजाच्या सुखदु:खात सहभागी होऊन समाज नावारूपाला आणण्याचे व्रत आम्ही घेतले आहे. जिथे अडचण येईल तिथे आम्ही खंबीरपणे सोबत राहू.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल आबा गुजर यांनी केले तर आभार प्रदर्शन देवसेना जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर यांनी केले. या कार्यक्रमाला लखन बहिरवाळ, नितीन बहिरवाळ, योगेश खटाने, गीता जी बहिरवाळ, सुरेश जगताप तसेच इतर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेत प्रगती
## विद्यालयाचे जायभाये व मिसाळ प्रथम

बीड:-महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग आरोग्य व शारीरिक शिक्षण संचलनालय पुणे तथा जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्यामार्फत जिल्हा स्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा बीड येथील छत्रपती स्टेडियम बीड या ठिकाणी दिनांक १८/०९/२५रोजी जिल्हास्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील इयत्ता सातवी मधील खेळाडू कु मिसाळ सिध्दी सोमीनाथ ३२ ते३५ किलो २)कु जायभाये सृष्टी विनोद इयत्ता आठवी ४४ ते४६ किलो ३) कु मिसाळ स्वरा सोमीनाथ ४४ते४६ किलो वजन गटात जिल्हा स्तरावर तायक्कांदो क्रीडा स्पर्धेत प्रथम आले आहे त्याबद्दल संस्थेचे संस्थापक आदरणीय रामकृष्णजी बांगर साहेब सचिव ताई साहेब युवा नेता बाळासाहेब बांगर जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर साहेब विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक गोपाळ घरे सर व कंठाळे सर क्रीडा शिक्षक शेख



अहमद सर सानप सर घोळवे सर ढवळे सर जायभाये सर कंठाळे सर वाघवालेसर कदम सर चव्हाण सर नागरगोजे सर ढाकणे सर मस्के सर तांदळे सर अग्रवाल मॅडम आदापुरे सर सोनवणे मॅडम नांदलगावकर मॅडम काकडे मॅडम परजने मॅडम निकाळजे मॅडम सानप मॅडम नागरगोजे मॅडम कुलकर्णी मॅडम नागरगोजे मॅडम कुलकर्णी मॅडम मुंडे मामा केदार मामा व सर्व कर्मचारी पालक वर्ग यांनी अभिनंदन केले व पुढील खेळात शुभेच्छा दिल्या

## सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या वतीने सेवा पंधरवडा निमित्त खंडेश्वरी परिसराची स्वच्छता

बीड प्रतिनिधी
सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड व महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागा अंतर्गत पुरातत्व व वस्तु संग्रहालय संचालनालय,विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवडा निमित्त खंडेश्वरी देवी येथील परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेमध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक व एनसीसीचे कॅडेटस यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. खंडेश्वरी परिसरातील दीपमाळ व त्या लगतचा परिसर स्वयंसेवकांनी स्वच्छ केला. या प्रसंगी सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग छत्रपती



संभाजीनगर येथील डॉ.कामाजी डक, डॉ.शांता जाधवर मुर्तिशास्त्र अभ्यासक यांनी विद्यार्थ्यांना मंदीर व त्यातील शिल्प याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या स्वच्छता मोहिमेमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे,पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, रासेयोचे कायक्रमाधिकारी डॉ. वाय. आर. घोडके, प्रा.जयंत साठे, एनसीसीचे कॅप्टन डॉ.बालाजी पोटे, डॉ पल्लवी इरलापल्ले, डॉ.सय्यद इमार, प्रा.संजय काळे,श्री.अंगत दराडे आदीसह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.या स्वच्छता मोहिमेमध्ये मुली व मुले मिळून एकूणा ५६ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

## ना. पंकजाताई मुंडेंना सावरगांव ग्रामस्थांनी दिले दसरा मेळाव्याचे निमंत्रण ; मेळाव्याची जोरदार तयारी सुरू

बीड : राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना आज सावरगांव घाट येथील ग्रामस्थांनी प्रत्यक्ष भेट घेऊन दसरा मेळाव्याचे रितसर निमंत्रण दिले. आपला दसरा, आपली परंपरा मेळाव्याची तयारी सध्या जोरदार पणे सुरू आहे.

श्री संत भगवान बाबा स्मारक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संदेश सानप यांच्या नेतृत्वाखाली सावरगांव घाट येथील ग्रामस्थांच्या एका शिष्टमंडळाने ना. पंकजाताईची आज बीड मध्ये भेट घेतली व सावरगांव येथे दरवर्षी होत असलेल्या दसरा मेळाव्याचे निमंत्रण दिले. निमंत्रण देताना ग्रामस्थ म्हणाले की,राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थळ असलेल्या मौजे सावरगांव घाट ता. पाटोदा जि. बीड येथील भगवान भक्तीगडावर दरवर्षीच्या प्रथे परंपरेप्रमाणे यंदाही आपला दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास दरवर्षी आपण उपस्थित राहून मार्गदर्शन करत असता. यावर्षी देखील ०२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दसरा मेळाव्यास आपण यावे आणि उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करावे अशी आम्हा सर्व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची इच्छा आहे. या शिष्टमंडळात सर्वश्री मुरलीधर मुकादम सानप,भागवत अप्पा सानप,जाणू दादा सानप,परमेश्वर खटके, जगनाथ सप्रे,तुळशीदास सानप,किसन सानप,मुरली नाना सानप,अश्रूबा दादा सानप, पांडुरंग सानप,राजु शिंदे,अनिल सानप,गणेश सानप आदी उपस्थित होते.

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन बाधीतांना तातडीने मदत करणार

बीड : जिल्ह्यात मागील काही दिवसात अतिवृष्टीने झालेल्या शेती तसेच मालमत्ता नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन बाधीत शेतकरी आणि नागरिकांना तातडीने मदत करणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा आढावा बैठकीत श्रीमती पंकजा मुंडे बोलत होत्या. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार चंद्रकांत शेळके तसेच संबंधित कार्यालय प्रमुख यांच्यासह सर्व तहसीलदार दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतपिकाचे तसेच मालमत्तेचे नुकसान झाले असून, शेतकरी व नागरिकांवर ओढवलेली ही संकटाची वेळ आहे. या संकटाच्या वेळी राज्य शासन त्यांच्या सोबत असुन, शक्य तेवढ्या लवकर नुकसानग्रस्तांना मदत करणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र जनावरांचे नुकसान, सतेच मालमत्तेचे नुकसान या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेवून मदत कार्यात कोणताही अडथळा येवू न देता शासनाकडून शक्य तेवढी मदत मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच अतिवृष्टीने वाहून गेलेली जनावरे यांची कागदपत्रे पुरावा नसला, तरी त्याची शहानिशा करून, संबंधीतांना नुकसानीची मदत मिळेल यासाइी प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यावर ओढवलेली ही संकटाची वेळ असुन, त्यामुळे कोणताही शेतकरी किंवा नागरिक मदतीपासून वंचित राहू नये याची प्रशासनाने काळजी घ्यावी. शेतकरी व सामान्य नागरिकांवर आलेल्या संकटाची तीव्रता लक्षात घेवून तातडीने पंचनामे करून मदत पोहोचविण्यात यावी, असेही त्या म्हणाल्या. जिथे गाळ साचला असेल, पूल वाहून गेला असेल किंवा पाणंद रस्ते, धोकादायक इमारती, ग्रामीण रस्ते यांच्या पुनर्वसनासाठी संबंधितांनी पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करावा. हा अहवाल मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करुन, यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ही श्रीमती मुंडे यावेळी म्हणाल्या. जिल्हाधिकारी व त्यांच्या टीमने परिस्थितीचे गांभिर्य ओळखून तसेच संकटाचा सामना करून, अतिवृष्टीतील परिस्थिती आटोक्यात आणली. तसेच सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांना वेळेत मदत पोहचविली त्याबद्दल जिल्हाधिकारी व त्यांच्या टीमचे श्रीमती मुंडे यांनी अभिनंदन करून समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सादरीकरणांद्वारे अतिवृष्टीत प्रभावित झालेल्या गावांची संख्या, बाधित शेतपिकांचे क्षेत्रफळ, पूर्णपणे व अंशत: नुकसानग्रस्त घरे, रस्ते, विद्यूत पोल यांचे झालेले नुकसान, जलस्रोत व पायाभूत सुविधावर झालेला परिणाम, घरे पूर्णपणे कोसळल्याने बाधित कुटूंबांसाठी तात्पुरती केलेली निवासाची सोय तसेच पुरात वाहून गेलेल्या नागरिकांची तसेच जनावरांची सविस्तर माहिती सादर केली.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
4
सोमवार दि. २२ सप्टेंबर २०२५




## माहूर ते बेलगाव रेणुकामातेच्या ज्योतचे ग्रामस्थांकडून जोरदार स्वागत,आज घटस्थापना,शारदीय नवरात्र उत्सवाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील तरुण दरवर्षी श्री क्षेत्र माहूरगड ते बेलगाव ४५० कि.मी.चे अंतर पायी चालत रेणुकाआईची ज्योत मोठ्या भक्ती भावाने उत्साहात घेऊन येतात. या पायी ज्योत सोहळ्याचे बेलगाव ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकाकडून मोठ्या उत्साहात जोरदार स्वागत करण्यात आले.आज देवीच्या मंदिरात घटस्थापना होणारा आहे.या नवरात्र उत्सवानिमित्त ग्रामस्थांकडून नऊ दिवस शारदीय नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी बेलगाव यांनी केले आहे.



आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील रेणुकामाता देवस्थानच्यावतीने सोमवार दि.२२ ते ०१ सप्टेंबर या काळात रेणुकामातेचा नवरात्रोत्सव आरंभ होत आहे.यानिमित्ताने बेलगाव येथील जागृत देवस्थान माहूरगडचे उपस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेणुकामाता मंदिरात आज सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी विधिवत पुजाअर्चा करून बेलगाव ग्रामस्थ व देवीभक्तांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात येणार आहे.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बेलगाव येथील तरुणांनी श्री क्षेत्र माहूरगड ते बेलगाव ४५० कि.मी.चे अंतर पायी चालत देवीची ज्योत घेऊन आले असून या पायी ज्योत चे ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. गेल्या १७ वर्षांपासूनची ही परंपरा कायम आहे.यामध्ये जवळपास २०० तरुण सहभागी होतात. बेलगाव आणि परिसरात रेणुकामातादेवीचे महात्म आहे.संपूर्ण पंचक्रोशीत ही देवी नवसाला पावते म्हणून तिची ख्याती आहे.निसर्गरम्य वातावरणात असलेले देवीचे मंदिर हे राज्यातील कानाकोपऱ्यातुन व आष्टी तालुक्यातील भाविकांसाठी एक तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.रेणुकामातेचे महात्म्य पूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. या देवस्थानला शासनाचा ''क'' दर्जा प्राप्त असून या देवस्थान परिसरात सद्यस्थितीला कोट्यावधी रुपयाचे विकास कामे प्रगतीपथावर असून लवकरच हे देवस्थानचा कायापालट होणार आहे.बेलगाव ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेभावाने नवरात्र महोत्सव साजरा करतात. ९ दिवस विविध कार्यक्रमाची धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल पाहायला मिळते.शेवटच्या दिवशी महाप्रसादाने सांगता होणार असून या नवरात्र उत्सवाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ बेलगाव यांनी केले आहे.

## ना. पंकजाताई मुंडेंना सावरगांव ग्रामस्थांनी दिले दसरा मेळाव्याचे निमंत्रण



बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांना आज सावरगांव घाट येथील ग्रामस्थांनी प्रत्यक्ष भेट घेऊन दसरा मेळाव्याचे रितसर निमंत्रण दिले. आपला दसरा, आपली परंपरा मेळाव्याची तयारी सध्या जोरदार पणे सुरू आहे.

श्री संत भगवान बाबा स्मारक मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संदेश सानप यांच्या नेतृत्वाखाली सावरगांव घाट येथील ग्रामस्थांच्या एका शिष्टमंडळाने ना. पंकजाताईंची आज बीड मध्ये भेट घेतली व सावरगांव येथे दरवर्षी होत असलेल्या दसरा मेळाव्याचे निमंत्रण दिले. निमंत्रण देताना ग्रामस्थ म्हणाले की,राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थळ असलेल्या मौजे सावरगांव घाट ता. पाटोदा जि. बीड येथील भगवान भक्तीगडावर दरवर्षीच्या प्रथे परंपरेप्रमाणे यंदाही आपला दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास दरवर्षी आपण उपस्थित राहून मार्गदर्शन करत असता. यावर्षी देखील ०२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दसरा मेळाव्यास आपण यावे आणि उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करावे अशी आम्हा सर्व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची इच्छा आहे. या शिष्टमंडळात सर्वश्री मुरलीधर मुकादम सानप,भागवत अप्पा सानप,जाणू दादा सानप,परमेश्वर खटके, जगनाथ सप्रे,तुळशीदास सानप,किसन सानप,मुरली नाना सानप,अश्रूबा दादा सानप, पांडुरंग सानप,राजु शिंदे,अनिल सानप,गणेश सानप आदी उपस्थित होते.



बीड : आहेर चिंचोली गावाला पुल नसल्यामुळे पेशंटला ट्रॅक्टर मध्ये नेण्यात आले शासनाने काहीतरी तात्काळ आहेर चिंचोली गावासाठी मदत करावी

## बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे –कांबळे

बीड । प्रतिनिधी

गेली अनेक महिन्यापासून आंबेडकरवादी अनुयाया कडून संविधानीक मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर उपोषण, आंदोलन करून मागणी वारंवार केली जात आहे. पालकमंत्री ना अजित (दादा) पवार,खासदार बजरंग सोनवणे यांना देखील निवेदने देऊन मागणी केली मात्र जिल्हा प्रशासन, पालकमंत्री हे याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आंबेडकरवादी अनुयायी यांच्या कडून सांगीतले जात आहे. १७ सप्टेंबर रोजी बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री बीड चे पालकमंत्री अजित (दादा) पवार साहेब, यांच्या हस्ते बीड रेल्वे चे उद्घाटन झाले. यावेळी देखील आंबेडकरवादी अनुयायांनी बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे करीता मागणी केली. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी शासन प्रशासन ठोस पावले उचलत नसल्याचे सांगत बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी भीमसैनिक प्रेम कांबळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे रात्री ९.३० च्या दरम्यान फाशी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.मात्र वेळीच त्यांना खाली उतरवून रुग्णालयात दाखल केल्याने प्राण वाचले.कांबळें यांची प्रकृती स्थिर

## त्याग, सेवा आणि कर्तृत्वाची दखल आम्रपाली साबळेंना दै.जननेता सन्मान

बीड । प्रतिनिधी

बीडच्या भूमीने नेहमीच धडाडीचे, परखड आणि जिद्दी व्यक्तिमत्व समाजाला दिले आहेत. आज पुन्हा एकदा बीडकरांचे डोळे अभिमानाने ओलावले आहेत, कारण आपल्या शहरातील न्यायासाठी झगडणारी, सत्यासाठी लढणारी, आणि समाजासाठी जगणारी आम्रपाली साबळे यांची निवड सायं. दैनिक जननेता सन्मान २०२५ या मानाच्या पुरस्कारासाठी झाली आहे.

१५ ऑक्टोबर २०२५ रोजी बीडमध्ये होणारा हा सोहळा फक्त एक कार्यक्रम नसून, तो समाजसेवेच्या प्रवासाला दिलेला मानाचा मुजरा आहे. माजी सैनिक सोपानराव गायकवाड यांच्या स्मानार्थ आयोजित या सोहळयात मोठ्या जनसमुदायासमोर आम्रपाली ताईंचा गौरव होणार आहे, ही खरंच प्रत्येक बीडकरासाठी कौतुकाची आणि हृदयाला भिडणारी बाब आहे. आम्रपाली साबळे या केवळ एक कार्यकर्त्या नाहीत. त्या अन्यायाच्या अंधारात ठामपणे उभ्या राहिलेल्या प्रकाशाची किरणे आहेत! त्या दबलेल्या आवाजांना ताकद देणाऱ्या, वंचितांना हक्क मिळवून देणाऱ्या,आणि समाजसेवेचा खरा अर्थ जगणाऱ्या आहेत. समाजसेवेसाठी

## शिक्षकांच्या निरोपसमारंभा प्रसंगी गुंदागावचे शिक्षणप्रेमी हळहळले

बीड । प्रतिनिधी

शासन नियमानुसार बीड जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत.अनेक शिक्षक बरेच वर्ष गावात राहिल्याने त्या शिक्षकांची नाळ तिथल्या मातीशी आणि माणसाशी जोडली गेलेली असते.ज्ञानदान करताना गावातील अनेक विद्यार्थी या गुरुवर्यांनी घडवलेले असतात.गावकरी,माता-भगिनी आणि गावातील विद्यार्थी यांच्याशी त्या शिक्षकाशी असलेले नाते फार हळवे आणि भावनात्मक असते,त्या नात्यात आपुलकी, स्नेह,आदर,जिव्हाळा आणि संवेदना असतात




अशातच जि.प.प्राथमिक शाळा गुंदा येथील श्री .तिळगुळ सर,भुसारे मॅडम,झांबरे सर, कुलकर्णी मॅडम व यादव मॅडम या शिक्षकांना निरोप देताना समस्त गावकरी,पालक, विद्यार्थी हळवे आणि भावनिक झाल्याचे दिसले.

हे सर्व शिक्षक गावात अनेक वर्ष येथे नोकरीला होते.त्यांचे ज्ञानदान आणि सेवा ही कधीच विसरता येणारी नाही.त्यांच्या अनेक आठवणी काळजात घर करुन बसलेल्या आहेत.त्यांनी गावातील अनेक विद्यार्थी गुणवान, विद्वान आणि सुसंस्कारी घडवलेले आहेत.त्यांनी शाळेला शिस्त लावली,त्यांनी शाळेची गुणवत्ता वाढवली.या सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला त्यामुळे त्यांच्या सेवेचे कौतुक म्हणुन गावातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांच्या वतीने त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी समस्त गुंदा ग्रामस्थ हळवे आणि भावनिक झाल्याचे आढळले. त्यांच्या

## राजकीय नेत्यांच्या वाढदिवसाला तलवार बाळगून ,तलवारीने केक कापल्याच्या आरोपातून भागवत खांडे ची निर्दोष मुक्तता ॲड.योगेश टेकाडे

पाटोदा । प्रतिनिधी

घटनेची हकीकत अशी की, मुकुंद सुर्यभान तांदळे वय पोहेक/११९४ ने.स्था.गु.शा.बीड यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद दिली की, मी स्था.गु.शा. बीड येथे दहा महीण्या पासुन पोहेक म्हणुन नेमणुकीस आहे. आज दि.२७/०६/२०२० रोजी पोनि श्री, भारत राऊत सो. स्था.गु.शा.बीड यांनी आदेश दिला की, शिवसेना जिल्हा अध्यक्ष यांचे वाढदिवसाचे कार्यक्रमा मध्ये येथे त्यांचे घरा समोर झालेल्या कार्यक्रमात केक कापते वेळी तलवारीचा वापर केल्याचे फोटो व्हटसअप व्दारे व्हायरल झाल्याने व त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करणे बाबत वरिष्ठांचे आदेश झाल्याने सदर फोटो ची पाहणी करुन त्यामधील नेत्याचा सविस्तर



जबाब पोनि श्री राऊत साहेब यांनी घेतला असता सदर जबाब मध्ये राजकीय नेत्याच्या वाढदिवसाचे कार्यक्रमा मध्ये त्हातात तलवार देऊन फोटो काढण्यात आला होता ती तलवार भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे रा. पिंपळगाव मंजरा यांचे असल्याचे सांगीतल्याने व सदर तलवार बाबत्? शोध घेऊन कायदेशीर कार्यवाही बाबत मला सांगीतल्याने मी व सोबत पोहेक/२४७ मोहन क्षीरसागर पोक/६८६ प्रदीप आशोक सुरवसे वा.चा. पोना/१०५१ राजु रुपचंद वंजारे असे सरकारी जिप क्रमांक -२३/ ९०२ मध्ये पोनि सो. आदेशाने बीड येथुन निघुन मौजे पिंपळगाव मंजरा येथे दोन पंचा सह भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे याचे रहाते घरी ची घरझडती घेणे कामी गेलो सदर ठिकाणी पिंपळगाव माजरा येथे जावुन गावातील भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे असे सांगीतले त्यास पंचा समक्ष घर झडती घेण्याचा उद्देश कळवुन व आम्ही व पंचानी आपआपली अंगझडती त्याचे घराची पाहणी व झडती घेतली असता त्याचे घरातील समोर खोलीचे स्लबचे खालील सिमेंट माळ्यावर वरील घरगुती सामाना खाली

खालील वर्णनाची व किंमती ची एक धारदार लोंखडी तलवार मिळुन आली तीचे वर्णन खालील प्रमाणे. एक मुठी सह लांबी ८० से.मी.पाते



बीड : श्री क्षेत्र चाकरवाडी येथे प्रतिवर्षी प्रमाणे सर्वपित्री अमावस्या निमित्त माजलगावकरांची भोजन पंगतीचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल माजलगावकरांचा श्री.महादेव महाराज चाकर वाडीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला असता.

## रिपाईच्या महाधरणे आंदोलनात हजारोच्या संख्येने शामिल व्हा- रवींद्र वीर

बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून कसत असलेल्या व नविन अतिक्रमणित गायरान जमिनीच्या प्रलंबित प्रकरणे नियमाकुल करुन गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी महाधरणे आंदोलनाचे आयोजक युवा रिपाई प्रदेशाध्यक्ष तसेच रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पुजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी



सकाळी ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हा रिपाइंच्या वतीने विराट महाधरणे आंदोलन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करून घेण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे.

१९९० शासन परिपत्रक (शासन जी.आर) नुसार गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक शेतमजूर व उसतोड कामगार यांना प्रतिमहिना ३००० रुपये पेन्शन (अनुदान)




काल झालेल्या नमो युवा नशा मुक्त मॅरेथॉन मॅरेथॉन स्पर्धेमध्ये योद्धा अकॅडमीने पुन्हा बाजी मारली १६ ते ३० वयोगटांमध्ये मुलामध्ये प्रथम क्रमांक माऊली आंधळे आणि मुलीमध्ये तिसरा क्रमांक मोहिनी उबाळे यांनी पटकावला....आणि ३० ते ६० वयोगटामध्ये मुलांमध्ये प्रथम क्रमांक रवि रकटे यांनी व मुलीमध्ये प्रथम क्रमांक अश्विनी नागरे यांनी पटकावून.... पुन्हा बीड जिल्ह्यामध्ये योद्धा अकॅडमी चे नाव पुन्हा एकदा रोशन केले आहे

## आज जरुड येथे आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सवाचे आयोजन

### आज ह.भ.प शांतिब्रह्म नवनाथ महाराज यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील जरुड (ता. बीड) येथे सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत व विविध संत-महंतांच्या आशिर्वादाने आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सव सोमवारी (दि.२२ सप्टेंबर) उत्साहात सुरुवात होत आहे.हा महोत्सव मंगळवार दि. ३० सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.**

या कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन ह.भ.प. शांतीब्रह्म नवनाथ महाराज (गोरक्षनाथ टेकडी) व ह.भ.प. अखंडानंद गिरीजी महाराज (श्रीक्षेत्र भवानीगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्यभरातील





मान्यवर कीर्तनकार व संत सहभागी होत असून, भाविक भक्तांसाठी अध्यात्मिक मेजवानी उपलब्ध झाली आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. स्वरमुर्ती रामेश्वर महाराज शास्त्री (लोणी शहाजनपूर), ह.भ.प. प्रतिभाताई गायकवाड, ह.भ.प. भागवताचार्य नवनाथ महाराज नाईकवाडे, ह.भ.प. युवाकीर्तनकार माऊली महाराज, ह.भ.प. बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते, ह.भ.प. सिताताई आवाड, ह.भ.प. भगवंत महाराज पुरी, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे यांच्यासह अनेक मान्यवर कीर्तनकारांचे कीर्तन सेवा होणार आहे. तसेच बुधवार दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी ह.भ.प.परमपूज्य गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे श्री क्षेत्र बंकट स्वामी मठ संस्थान नेकनूर आळंदी पंढरपूर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. तसेच या महोत्सवात विविध भजनी मंडळे,

## कालिकादेवी विद्यालय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातून अव्वल

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

शिरूर (कासार) 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गटशिक्षण कार्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.)जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय बुद्धिबळ स्पर्धा वयोगट १७ व १९ वर्षाखालील मुलांसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी




विद्यालयाचे मा.प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार चि.शोयब शौकत आत्तार या विद्यार्थ्याने १७ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला.तर १९ वर्ष वयोगटात अनुक्रमे कु.सानिका शरद शिंदे व कु.राणी राजेंद्र शिंदे यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.या जिंकलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलांच्या बुद्धिबळ स्पर्धेची तयारी अतिशय कौशल्याने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन्ही गटात तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुक्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील तिन्ही विद्यार्थी स्पर्धकांना